**<u>ठळक बातम्या</u>**

- भारत आणि पाकिस्तान यांच्यात इतर कुणाच्या मध्यस्थीचा प्रश्नच उद्भवत नसल्याची परराष्ट्रव्यवहार मंत्र्यांची स्पष्टोक्ती, पाकिस्ताननं दहशतवादाची रसद कायमची तोडल्याचं स्पष्ट होईपर्यंत सिंधू जल करार स्थगित राहणार
- विधीमंडळानं संमत केलेल्या विधेयकांवर कार्यवाहीसाठी राज्यपालांना कालमर्यादा घालण्याचा अधिकार न्यायालयाला आहे का, अशी राष्ट्रपतींची सर्वोच्च न्यायालयाकडे विचारणा
- महाराष्ट्रात महानगरपालिका निवडणुका लौकर घेण्याचा प्रयत्न असून या निवडणुका महायुती एकत्रच लढणार असल्याचं मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन
- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे बाराशे अंकांची वाढ

  **आणि**

- खेलो इंडिया क्रीडा स्पर्धेचा समारोप /१५८ पदकं जिंकत महाराष्ट्र अव्वल

**<><><><><>**

ऑपरेशन सिंदूर ही भारताची दहशतवादविरोधातली आतापर्यंतची सर्वात मोठी कारवाई आहे, असं प्रतिपादन संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी आज केलं. ते आज जम्मू आणि काश्मीरच्या दौऱ्यासाठी श्रीनगर इथे पोहोचल्यानंतर संरक्षण दलांना संबोधित करत होते. ऑपरेशन सिंदूर हे एक नाव नसून ती आपली देशाच्या संरक्षणाप्रति असलेली वचनबद्धता आहे, असं ते म्हणाले…

**होल्ड - बाईट- राजनाथ सिंह**

राजनाथ सिंह यांनी यावेळी श्रीनगरमधल्या लष्कराच्या १५ व्या कोअरच्या मुख्यालयालाही भेट दिली आणि ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर तयारी आणि घडामोडींच्या सर्व पैलूंबद्दल माहिती घेतली.

<><><><><>

भारत आणि पाकिस्तानदरम्यान इतर कोणाच्या मध्यस्थीचा प्रश्नच उद्भवत नाही, असं ठाम प्रतिपादन परराष्ट्रव्यवहार मंत्री डॉ. एस जय शंकर यांनी केलं आहे. नवी दिल्लीत एका कार्यक्रमाच्या वेळी ते बातमीदारांशी बोलत होते. पाकिस्तानशी चर्चा द्विपक्षीयच होईल, ती देखील काश्मीरमधे पाकिस्तानने केलेलं अतिक्रमण हटवण्याच्या मुद्द्यावरच असं त्यांनी स्पष्ट केलं. या संदर्भात भारताच्या भूमिकेत काहीही बदल झालेला नाही आणि या मुद्यावर कायम देशभरात सहमती आहे असं ते म्हणाले. पाकिस्ताननं दहशतवाद्यांचे आसरे उद्धवस्त करुन त्यांना भारताच्या हवाली केलं पाहिजे. उभय देशांदरम्यान गोळीबार आणि लष्करी कारवाई संदर्भात ते म्हणाले की ही कारवाई केवळ दहशतवाद्यांच्या अड्ड्यांवर असून पाकिस्तानी लष्कराने त्यापासून दूर राहावं असा संदेश भारताने दिला होता. मात्र पाकिस्तानने तो मानला नाही. १० मे रोजी पाकिस्तानला जबर फटका बसल्यानंतर त्यांनी शस्त्रसंधीचा प्रस्ताव ठेवला. पाकिस्ताननं दहशतवादाची रसद कायमची तोडल्याचं स्पष्ट होईपर्यंत सिंधू पाणी वाटप करार स्थगित राहील असं त्यांनी सांगितलं.

अमेरिकेबरोबरच्या व्यापाराविषयी वाटाघाटी सुरु असून उभयपक्षी हिताचा तोडगा काढण्याचा प्रयत्न सुरु असल्याचं त्यांनी एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितलं.

<><><><><>

राज्यविधीमंडळानं मंजूर केलेल्या विधेयकांवर कार्यवाही करण्यासाठी राज्यपालांना कालमर्यादा देण्याचा अधिकार न्यायालयाला आहे का, अशी विचारणा राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सर्वोच्च न्यायालयाकडे केली आहे. तमिळनाडू विधानसभेनं मंजूर केलेली विधेयकं राज्यपालांकडे दीर्घ काळ प्रलंबित राहिल्याप्रकरणी दिलेल्या निवाड्यात सर्वोच्च न्यायालयानं म्हटलं होतं की विशिष्ट कालावधीत राज्यपालांनी विधेयकांवर निर्णय घेतला पाहिजे. त्या कालावधीत

निर्णय घेतला नाही तर राज्यपालांची संमती गृहीत धरण्यात यावी असंही न्यायालयानं म्हटलं आहे.

त्यासंदर्भात १४ वेगवेगळे प्रश्न राष्ट्रपतींनी उपस्थित केले आहेत. संविधानाच्या कलम २०० आणि २०१ मधे राज्यपालांच्या कार्यपद्धतीविषयीच्या तरतुदी आहेत, मात्र त्यात अशी कालमर्यादा पाळण्याबाबतचा उल्लेख नाही. तसंच हा निर्णय राज्यपाल आणि राष्ट्रपतींच्या संविधानदत्त शक्ती आणि अधिकारांवर अतिक्रमण करणारा आहे का, याचा विचार करावा असं राष्ट्रपतींनी आपल्या पत्रात म्हटलं आहे.

**<><><><><>**

ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर भारतीय सैन्याचा सन्मान, आणि शूरवीरांना मानवंदना देण्यासाठी भाजपातर्फे देशभरात तिरंगा यात्रा सुरु आहे. २३ मेपर्यंत ही यात्रा सुरू राहणार आहे.

गुजरातमधे मोतीबाग टाऊन हॉल पासून शहीद मेमोरियलपर्यंत काढलेल्या भव्य तिरंगा यात्रेला केंद्रीय मंत्री निमुबेन बांभनिया यांनी झेंडा दाखवला. राज्याचे मंत्री हर्ष संघवी गांधीनगर इथल्या तिरंगा यात्रेत सहभागी झाले. जामनगरमधे ८ किलोमीटर लांबीची मिरवणूक काढण्यात आली.

जम्मू-कश्मीरमधे श्रीनगर इथं काढलेल्या तिरंगा यात्रेचं नेतृत्व भाजपा नेत्या आणि जम्मू-कश्मीर वक्फ बोर्डाच्या अध्यक्ष दारक्षण अंद्राबी यांनी केलं. तर अनंतनाग इथं सोफी युसूफ यांच्या नेतृत्वाखाली तिरंगा यात्रा काढण्यात आली.

पंजबामधे जालंधर इथं, तर महाराष्ट्रात बीड जिल्ह्यात अंबाजोगाई आणि परळी, तसंच अहिल्यानगर जिल्ह्यात कोपरगाव इथंही आज भव्य तिरंगा रॅलीचं आयोजन करण्यात आलं.

**<><><><><>**

भारतीय विमानतळांवर सेवा देणाऱ्या सेलेबी या तुर्की कंपनीचा सुरक्षा परवाना रद्द करण्याचा निर्णय नागरी हवाई वाहतूक मंत्रालयानं घेतला आहे. राष्ट्रीय हिताचं रक्षण याला सरकारचं सर्वोच्च प्राधान्य असून त्यादृष्टीनं हा निर्णय झाल्याचं केंद्रीय हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी सांगितलं. सेलेबी कंपनीची सुरक्षा मंजुरी रद्द करावी, अशी मागणी देशभरातून होत होती, असंही ते म्हणाले.

पुण्यातल्या सुका मेवा व्यापाऱ्यांनी तुर्कीएमधून येणाऱ्या सुक्या मेव्यावर बहिष्कार टाकला आहे. पुणे मार्केट यार्ड परिसरातल्या व्यापारी संघटनेनं आधी देश नंतर व्यापार, अशी भूमिका घेतली आहे.

भारत पाकिस्तान संघर्षादरम्यान पाकिस्तानच्या बाजूनं उभं राहणाऱ्या तुर्कीएसोबतचा सामंजस्य करार जवाहरलाल नेहरु विद्यापीठ-जेएनयूनं रद्द केला आहे. अनेक पर्यटन कंपन्यांनीही तुर्कीए आणि अझर बैजानमधली नोंदणी रद्द केली आहे.

**<><><><><>**

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार राज्यात महानगरपालिका निवडणुका वेळेवर घेण्याचा राज्यशासनाचा प्रयत्न असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सांगितलं. ते आज पुण्यात महानगरपालिका अधिकाऱ्यांसाठीच्या कार्यशाळेत मार्गदर्शन करण्यासाठी गेले असता बातमीदारांशी बोलत होते. या निवडणुका महायुती एकत्रच लढवणार असून कार्यकर्त्यांच्या मागणीनुसार अपवादात्मक ठिकाणी मैत्रीपूर्ण लढती होतील असं ते म्हणाले.

**होल्ड--बाईट--मुख्यमंत्री**

**<><><><><>**

मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स आज बाराशे  अंकांनी वधारला आणि ८२ हजार ५३१ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी ३९५  अंकांनी वधारला आणि २५ हजार ६२  अंकांवर बंद झाला.

धातू, वाहन उद्योग, माहिती तंत्रज्ञान आणि बांधकाम क्षेत्रातल्या समभागांची आज मोठ्या प्रमाणात खरेदी झाली. त्यामुळे आज दिवसभरात सेन्सेक्सनं  चौदाशे अंकांचा उच्चांक नोंदवला.

**<><><><><>**

क्रीडा क्षेत्रातल्या क्षमतेमुळे भारत एक सुप्त शक्ती म्हणून जगात उदयाला येत आहे, असं प्रतिपादन केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी केलं. सातव्या खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धांची सांगता आज बिहारमधे पटना इथं पाटलीपुत्र क्रीडा प्रेक्षागृहात झाली, त्यावेळी त्या बोलत होत्या.

या स्पर्धेत ५८ सुवर्ण आणि ४७ रौप्य पदकांसह १५८ पदकं मिळवून महाराष्ट्रानं अव्वल साथान पटकावलं. हरियाणानं ३९ सुवर्ण आणि २७ रौप्य पदकांसह एकूण ११७ पदकं मिळवून दुसरे स्थान पटकावलं. तर राजस्थान २४ सुवर्ण पदकांसह ६० पदकं मिळवून तिसऱ्या स्थानावर राहिला.

**<><><><><>**

मत्स्यव्यवसाय क्षेत्रातल्या पायाभूत सुविधा बळकट करण्याच्या दृष्टीनं सरकारनं अनेक उपाय योजले आहेत, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज सांगितलं. ते नवी दिल्लीत मत्स्यव्यवसाय क्षेत्रातल्या प्रगतीचा आणि भविष्यातल्या उपायांचा आढावा घेणाऱ्या बैठकीत बोलत होते. अति खोल समुद्रातली  मासेमारी आणि सागरी खाद्यान्नाची निर्यात या मुद्द्यांवर या बैठकीत विशेष चर्चा झाली. मच्छीमारांना अधिक पतपुरवठा व्हावा तसंच बाजारपेठेपर्यंत सुलभपणे पोहोचता यावं, यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचं प्रधानमंत्री  म्हणाले.

**<><><><><>**

ऑपरेशन सिंदूरची जगभरातून प्रशंसा होत आहे. दीर्घ काळापासून अशी मोहीम राबवण्याची आवश्यकता होती असं ब्रिटीश लेखक आणि राजकारण विश्लेषक डेव्हिड व्हान्स यांनी म्हटलं आहे. पाकिस्तान अपयशी, आणि दहशतवादी कारवायांचं माहेरघर असल्याचं मत त्यांनी एका वृत्तसंस्थेला मुलाखत देताना व्यक्त केलं. पहलगाम हल्ल्याचं वार्तांकन करताना पाश्चिमात्य प्रसारमाध्यमांनी दहशतवाद्यांना केवळ हल्लेखोर असं संबोधलं याबद्दल त्यांनी टीका केली.